परिणामीत सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
शासन आदेश क्र.एसजीए-१५२००५/(२३२/६)/कामगार-५
दिनांक :- १९ जून, २००६

## आदेश

परिणामीत सुरक्षा रक्षकांची सुरक्षा रक्षक मंडळात नोंदणीबाबत शासनाने दि.३०.५.२००२ रोजी शासन आदेश क्र.एसजीए/१५२००२/(७८/४)/कामगार-५ निर्गमित केला होता. परंतु सदर आदेशातील २४० दिवसांची अट रद्द करण्याबाबत विविध कामगार संघटनेकडून शासनाकडे मागणी होत होती. सदर मागणीस अनुसरुन शासन आता सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करण्याबाबतचा दि.३०.५.२००२ रोजीचा शासन आदेश रद्द करीत आहे.

सुरक्षा रक्षक मंडळात नोंदणी करण्यासंदर्भात भविष्यात कुठल्याही प्रकारची अस्पष्टता राहू नये याकरीतां महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ८(४) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करुन शासन खाली नमूद केल्याप्रमाणे सुधारीत आदेश देत आहे.

(१) खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीमार्फत शासनाची सूट न घेता विनापरवानगी सुरक्षा रक्षक नियुक्त केलेल्या आस्थापनेस मंडळाच्या निरीक्षकांनी भेट देवून सुरक्षा रक्षक अधिनियमांतर्गत तयार केलेल्या योजनेतील तरतूदीनुसार कारवाई केल्यानंतर प्रमुख नियोक्त्याने स्वत: मंडळात नोंदीत होऊन त्यांच्याकडे काम करीत असलेल्या सुरक्षा रक्षकांनाही मंडळात नोंदीत करुन त्यांच्याच आस्थापनेमध्ये वितरीत करवून घ्यावे. सदर प्रमुख नियोक्त्यास प्रथम मंडळात नोंदीत करुन घ्यावे, तसेच त्यांच्याकडे काम करीत असलेल्या सुरक्षा रक्षकांना सरळ सेवेत भरती करण्यात येणाऱ्या सुरक्षा रक्षकांबाबत नमूद केलेल्या शारीरिक व शैक्षणिक पात्रतेच्या अटींच्या अधिन राहून तसेच संबंधित सुरक्षा रक्षकांनी त्यांचे हजेरीपत्रक/वेतनपत्रक, प्रमुख नियोक्त्यांकडे केव्हा पासून कामास आहे याबाबतचा तपशील इत्यादीपैकी प्रमाणित अभिलेख मंडळास सादर केल्यावर विभागीय निरीक्षकांनी त्याची तपासणी प्रमुख नियोक्त्याकडे तसेच सुरक्षा रक्षक एजन्सीकडे भेट देवून करावी व सदर दोन्ही अभिलेख तपासून त्याच्या सत्यासत्यतेबाबत खात्री करावी आणि त्यानंतरच सदर सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करण्यात यावी व त्यांना सदर मुख्य मालकाकडे वितरीत करण्यात यावे.

(२) मंडळाच्या निरीक्षकांनी केलेल्या कार्यवाहीचा परिणाम म्हणून जर प्रमुख नियोक्ता मंडळाकडे नोंदीत होऊन, त्यांनी त्यांचेकडील कार्यरत खाजगी सुरक्षा रक्षकांऐवजी मंडळाकडील प्रतिक्षा यादीवर सुरक्षा रक्षकांची मागणी केल्यास सदर प्रमुख नियोक्त्यास नोंदीत करुन घेऊन त्यांना मंडळाचे प्रतिक्षा यादीवरील सुरक्षा रक्षक वितरीत करावेत आणि त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांना वरील परिच्छेद १ मधील अटींच्या

...२

अधिन राहून मंडळामध्ये नोंदीत करावे व त्यांना मंडळाच्या प्रतिक्षा यादीवर ठेऊन कामाच्या उपलब्धतेनुसार काम देण्यात यावे.

(३) एखादा प्रमुख नियोक्ता आणि त्याच्याकडील खाजगी ठेकेदारामार्फत कार्यरत सुरक्षा रक्षक हयांनी स्वेच्छापूर्वक स्वतःहून मंडळाकडे येऊन मंडळात नोंदणी करण्याबाबत मागणी केल्यास सदर प्रमुख नियोक्त्यास मंडळात नोंदीत करुन घ्यावे. तसेच त्यांच्याकडील सुरक्षा रक्षकांनाही वरील परिच्छेद १ मधील अटीस अधीन राहून मंडळात नोंदीत करुन घेतलेले सुरक्षा रक्षक यांनाच पुरविण्यात यावेत.

(४) आस्थापनेत/प्रमुख नियोक्त्याकडे काम करीत असल्यासंबंधीचा पुरावा संबंधित ठेकेदार तसेच प्रमुख नियोक्त्याकडून प्राप्त करुन अर्जासोबत जोडण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील. यामध्ये हजेरीपत्रक, वेतनपत्रक, कामाचा तपशील इत्यादीपैकी अर्जदाराने पुराव्यादाखल सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी/सत्यासत्यता संबंधित क्षेत्रिय निरीक्षक करतील.

(५) न्यायालयाच्या निर्णयामुळे नोंदीत होणाऱ्या सुरक्षा रक्षकांनाही वरील परिच्छेद १ मधील अटीस अधिन राहून आस्थापनेसह मंडळात नोंदीत करावे.

(६) या शासन आदेशास अनुसरुन मंडळात नोंदणी केलेला प्रत्येक प्रमुख नियोक्ता तसेच सुरक्षा रक्षक यांचे सर्व अभिलेख मागणी केल्यास मंडळ शासनास सादर करेल व सदर अभिलेखासोबत नोंदणी करताना कोण-कोणत्या बाबीची छाननी केली याची माहितीही मंडळ शासनास सादर करील.

(७) सदरहू आदेश निर्गमित झाल्यापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
(चं.रा. गोसावी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
३) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक
४) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) सह आयुक्त कामगार (माथाडी), ताडदेव, मुंबई
६) अध्यक्ष, सर्व सुरक्षा रक्षक मंडळ
७) सर्व जिल्हा सहाय्य कामगार आयुक्त/कामगार अधिकारी

AKWGR९३८